**पोलीस अधीक्षक कार्यालय,धाराशिव**
जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, छ.संभाजीनगर-सोलापूर रोड, धाराशिव
दूरध्वनी क्र.02472-222717 फॅक्स क्र.02472-227626
Email ID : sp.osmanabad@mahapolice.gov.in




जा.क्र.प्रलि-आस्था/चापोशि-2024-25/नि.आदेश/2026/ 7311 धाराशिव दिनांक 14/08/2026

**विषय :- चालक पोलीस शिपाई भरती 2024-25 पदी नियुक्ती बाबत.**

--000--

:: **आदेश** ::

धाराशिव जिल्हा पोलीस घटकात सन- 2024-25 मध्ये रिक्त असलेल्या चालक पोलीस शिपायांचे पदाकरीता पोलीस भरती प्रक्रिया पार पडली आहे. सदर भरती प्रक्रीयेत कौशल्य चाचणीत पात्र ठरलेल्या आणि लेखी व मैदानी चाचणीमध्ये प्राप्त गुणांनुसार खालील उमेदवार पात्र ठरले आहेत. त्यानंतर सदर उमेदवार वैद्यकीय तपासणीत वैद्यकीय दृष्टया, चारित्र्य पडताळणीत पात्र असून व **मूळ कागदपत्र** पात्रतेच्या अधीन राहून खालील उमेदवार धाराशिव जिल्हा पोलीस घटकांत "**चालक पोलीस शिपाई** " संवर्गात नियुक्तीकरिता पात्र ठरलेले आहेत.

महाराष्ट्र पोलीस नियमावली-1999 भाग-1 मधील नियम क्रमांक-63 मध्ये दिलेल्या अधिकारानुसार व महाराष्ट्र सहायक पोलीस उप निरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम- 2019 व त्यानंतर शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारणा आणि दिनांक 27/06/2022, दिनांक 23/09/2022 व दिनांक 23/09/2022 च्या केलेल्या सुधारीत तरतुदीनुसार खालील नमुद उमेदवार यांना **धाराशिव जिल्हा पोलीस दलाच्या** आस्थापनेवर **"चालक पोलीस शिपाई" गट-क** या संवर्गात सुधारीत वेतन मॅट्रिक्स मधील वेतन स्तर एस-7 रु. 21700-69100 मध्ये मुळवेतन रुपये 21700 या प्रारंभिक वेतनावर (विशेष वेतन रुपये 750/- व अधिक नियमानुसार देय असणारे भत्ते याप्रमाणे ) त्यांना पोलीस मुख्यालय, धाराशिव येथे हजर झाल्या दिनांकापासुन खाली नमुद केलेल्या अटी व शर्तींचे अधिन राहुन **अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात** नियुक्ती देण्यात येत आहे.

| अ. क्र. | चेस्ट नंबर | पुरुष / महीला | उमेदवाराचे नाव | जातीचा प्रवर्ग | नियुक्तीचा प्रवर्ग | समांतर आरक्षण | बक्कल नंबर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 3992 | पुरुष | ज्ञानेश्वर प्रभाकर कोल्हे | एनटीसी | खुला | -- | 1442 |
| 2 | 4482 | पुरुष | तुषार भिमाण्णा चौगुले | एनटीसी | खुला | -- | 1883 |
| 3 | 6801 | पुरुष | प्रथमेश विजयकुमार माने | व्हीजऐ | खुला | -- | 1821 |
| 4 | 7426 | पुरुष | विजय ज्ञानेश्वर भुजबळ | ओबीसी | खुला | -- | 1564 |
| 5 | 8702 | महिला | ऋतुजा राजेंद्र ठोंगे | एसईबीसी | खुला | महिला | 1829 |
| 6 | 4426 | पुरुष | अर्जुन कैलास फोलाने | एसईबीसी | एसईबीसी | -- | 1410 |
| 7 | 5234 | पुरुष | समाधान विठोबा आवटे | ओबीसी | ओबीसी | -- | 1195 |
| 8 | 8789 | महिला | सुप्रिया प्रेमानंद पाटील | ओबीसी | ओबीसी | महिला | 1284 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 4435 | महिला | शुभम बाळु होळकर | एसबीसी | एसबीसी | -- | 1084 |
| 10 | 6103 | पुरुष | निलेश मारोती शिवरकर | एनटीबी | एनटीबी | -- | 1342 |
| 11 | 5291 | पुरुष | अविनाश नामदेव आमले | एसटी | एसटी | -- | 1393 |
| 12 | 3915 | पुरुष | प्रथमेश विजय बनसोडे | एससी | एससी | -- | 1544 |
| 13 | 8757 | महिला | प्रतिक्षा पुनाप्पा कर्पे | एससी | एससी | माहिला | 1719 |

**अटी व शर्ती खालील प्रमाणे**

१) सदरची नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपाची राहील. शासनास त्यांच्या सेवेची आवश्यकता नसल्यास कोणत्याही प्रकारचे कारण न दर्शविता अथवा आगाऊ सूचना न देता केव्हाही सेवेतून सेवामुक्त करण्यात येईल.

२) चालक पोलीस शिपाई पदावर नियुक्ती ही अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने कोणतेही कारण न देता **मुंबई पोलीस नियमावली-1959 भाग-1 मधील नियम क्रमांक 78 (1) (i) ते (viii)** अन्वये आपली सेवा केव्हाही समाप्त करण्याची तरतूद आहे अथवा **मुंबई पोलीस (शिक्षा व अपिल) नियम-1956** मधील तरतुदींनुसार सेवा समाप्त करण्यात येईल.

३) महाराष्ट्र चालक पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम-2019 मधील नियम-15 नुसार चालक पोलीस शिपाई या पदासाठी विहित केलेले प्रशिक्षण पूर्ण करावेच लागेल व संबंधीत परीक्षा चार संधीमध्ये उत्तीर्ण व्हावे लागेल. जर चार संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण झाला नाही तर आपली सेवा समाप्त करण्यात येईल. या कालावधीत वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय असणार नाही तसेच नियम 15 (2) नुसार परिक्षा विहीत संधीत उत्तीर्ण झाल्यानंतर वेतनवाढ देय होईल परंतु वेतनवाढ रोखून धरल्यामुळे देय होणारी थकबाकी मिळण्याचा हक्क असणार नाही.

४) प्रशिक्षण कालावधीत नियुक्ती दिलेल्या नवप्रविष्ठ चालक पोलीस शिपाई यांना दुखापत झाल्यास त्याबद्दल कोणत्याही प्रकारच्या नुकसान भरपाईस ते पात्र राहणार नाहीत.

५) प्रशिक्षण कालावधीत/अस्थायी सेवेत नियुक्ती दिलेल्या नवप्रविष्ठ चालक पोलीस शिपाईमध्ये दोष आढळल्यास किंवा कोणतेही बेशिस्त, गैरवर्तन किंवा नितिमुल्यांचा ऱ्हास करणारे अशोभनिय कृत्य केल्यास, पोलीस सेवेत स्वारस्य न दाखविल्यास किंवा प्रशिक्षण कालावधीत वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पुर्व परवानगीशिवाय गैरहजर राहिल्यास, त्यांना कोणत्याही प्रकारची पुर्वसूचना/ नोटीस न देता त्यांची सेवा समाप्त (Terminate) करण्यात येईल.

६) चालक पोलीस शिपाई पदाचा राजीनामा दिल्यास पुनर्नियुक्तीचा विचार केला जाणार नाही.

७) चालक पोलीस शिपाई या पदावर रुजु झाल्या तारखेपासुन 03 महिन्याच्या आत उमेदवाराने म.शा.शा.नि. सा. प्र.वि. क्र.सी. आर./1079/2059/223/11,दिनांक 20/11/1980 नुसार विहीत केलेले मत्ता व दायीत्व (Assets and Liabilities) बाबतचे विवरणपत्र स्वत:हुन भरुन पोलीस अधीक्षक कार्यालय, धाराशिव येथे सादर करणे बंधनकारक आहे.

८) शा.नि.क्र.अंनियो 1005/126/सेवा-4, दिनांक 31/10/2005 अन्वये दिनांक 01/11/2005 नंतर शासकीय सेवेत नियुक्ती झालेल्या कर्मचा-यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती योजना लागु ठरेल. सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम 1982 व महाराष्ट्र नागरी

सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण नियम 1984) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना आपणास लागु होणार नाही. तसेच शासन वित्त विभाग निर्णय क्र. अंनियो-2012/प्र.क्र.96/सेवा-4, दिनांक 21/08/2014 नुसार नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना यापुढे "राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (एनपीएस)" या नावाने लागू राहील.

९) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक रानियो-2022/प्र.क्र.34/ सेवा 4 दिनांक 31/03/2023 परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना / राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली अंतर्गत कर्मचाऱ्यांचा सेवाकालावधीत मृत्यू झाल्यास त्याच्या कुटूंबियांना कुटूंब निवृत्तीवेतन आणि मृत्यू उपदान व रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्याला कुटूंब निवृत्तीवेतन आणि सेवा उपदान तसेच शासन सेवेतून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवा उपदान मंजूर करणेबाबत मधील नियम -6 नुसार **कुटूंबाचा तपशिल व विकल्पाचा नमुना नियुक्ती दिनांकापासून 8 दिवसांचे आत या कार्यालयाकडे सादर करावा**.

१०) शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000/12 दि.01/07/2005 अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम,2005 मधील नियम-4 नमुना-अ नुसार ह्यात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक 28/06/2006 व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे अनर्ह ठरविण्यास पात्र ठरतील.

११) महाराष्ट्र शासन,गृहविभाग पत्र क्र.पीएसबी-0311/प्र.क्र.521/पोल-5अ,दिनांक 26/09/2011 नुसार नियुक्ती दिलेल्या नवप्रविष्ठ चालक पोलीस शिपाई यांनी प्रशिक्षण कालावधीत अथवा प्रशिक्षण संपल्यानंतर पुढील तीन वर्षात चालक पोलीस शिपाई या पदावरील नोकरीचा राजीनामा दिल्यास वा सदर पदावरुन कार्यमुक्त करण्यांस विनंती केल्यास, त्यांचेकडून प्रशिक्षणावर झालेला सर्व खर्च व प्रशिक्षण कालावधीत अदा केलेले वेतन व भत्यासहीत वसुल करण्यांत येईल. अशा प्रकारचे बंधपत्र करुन दयावे लागेल.

१२) आपणास महाराष्ट्र शासन नियमाप्रमाणे हिंदी व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण व्हाव्या लागतील. महाराष्ट्र चालक पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम-2019 मधील नियम-13 नुसार नियुक्ती दिलेल्या चालक पोलीस शिपाई यांना मुंबई पोलीस मॅन्युअल-1959, मुंबई पोलीस ( शिस्त व अपिल ) नियम-1956 तसेच राज्य शासनाने वेळोवेळी विहीत केलेले अन्य नियम लागु होतील.

१३) म.शा.सा.प्र.वि.शा.नि.क्र.बीसीसी 2011 /प्र.क्र.-1064/2011/16-ब, दिनांक 12/12/2011 अन्वये विशिष्ट मागासप्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर ज्या उमेदवारांची निवड झालेली आहे व ज्या उमेदवाराजवळ जात वैधता प्रमाणपत्र नसेल अशा उमेदवारांस त्यांच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहुन त्यांची तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यात येत आहे. सदरचे नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर अशा उमदेवारांना नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासुन 06 महिन्याचे आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समीतीकडुन करुन घेणे आवश्यक राहील. तसेच त्याने नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी प्रस्ताव संबंधित जात पडताळणी समीतीकडे सादर करावा व जात पडताळणी समीतीने दिलेल्या पोहोच पावतीची साक्षांकित प्रत या कार्यालयास सादर करावी. जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविल्यास आपणास शासकीय सेवेतून कमी करण्यात येईल/आपली सेवा समाप्त करण्यात येईल व आपणास देण्यात आलेले सर्व लाभ काढून घेण्यात येतील.

१४)महाराष्ट्र सहायक पोलीस उप निरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक, पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश ) नियम-2019 अन्वये आणि त्यामध्ये दिनांक 06/09/2019 मधीलनियम 06 चा उपखंड (1)(क)(2) झालेल्या सुधारीत शासन आदेशान्वये नियुक्ती दिनांकापासून पुढील **पाच वर्षांच्या आत**

जड वाहन (HGV) आणि  जड वाहन प्रवासी (HPMV) चालविण्याचा परवाना प्राप्त करुन घटक कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे. अन्यथा पुढील वेतनवाढीस तसेच पदोन्नतीकरिता पात्र राहणार नाही.

१५) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. प्रशिक्षण-2000/प्र.क्र.61/2001/39, दिनांक 19/03/2003 नुसार संगणक हाताळणीबाबतचे प्रमाणपत्र नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहिल. अन्यथा आपली सेवा समाप्त होईल. तसेच शासन निर्णय माहिती तंत्रज्ञान (सामान्य प्रशासन विभाग) विभाग क्र. मातंस 2012/प्र.क्र. 277/39, दिनांक 04/02/2013 मध्ये नमूद केलेल्या संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक 86 प्रमाणपत्रांपैकी कोणतेही एक प्रमाणपत्र धारण केलेले असावे.

१६) महाराष्ट्र सहायक पोलीस उप निरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम-2019 मधील नियम 06 चा उपखंड (1)(क)(3) नुसार कोणतेही मादक द्रव्ये किंवा मद्यसेवन करुन वाहन चालविण्यासंदर्भातील मोटार वाहन अधिनियम-1988 मधील कोणत्याही अपराधासाठी सिध्द झालेला नसावा. असल्यास योग्य ती कार्यवाही करण्यास पात्र असेल.

१७) उमेदवारांची नियुक्ती ही त्यांचे शैक्षणिक व सामाजिक कागदपत्रे (जात प्रमाणपत्र / रहिवास प्रमाणपत्र / उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र / महिला आरक्षण / खेळाडू / भूकंपग्रस्त / प्रकल्पग्रस्त / माजी सैनिक / पोलीस पाल्य / होमगार्ड/अनाथ/ आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक / सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग इ.) तपासण्याच्या अधीन राहून देण्यात येत आहे. उमेदवार कागदपत्र पडताळणीमध्ये अपात्र ठरल्यास किंवा त्यांची कागदपत्रे अवैध ठरल्यास त्यांची नियुक्ती तात्काळ प्रभावाने रद्द करण्यात येईल व त्यांना शासकीय सेवेमध्ये कायमस्वरुपी अपात्र घोषित करण्यात येईल.

१८) याचिका क्र.2136/2011 व अन्य याचिकांवर मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या छ.संभाजीनगर खंडपीठाने दिनांक 25/08/2011 रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे एसएलपी दाखल करण्यात आली आहे. यावर मा. सर्वोच्च न्यायालयाकडून जे काही आदेश दिले जातील त्या आदेशाच्या अधीन राहून सदर नियुक्ती आदेश राहील.

१९) चालक पोलीस शिपाई पदावर नियूक्ती दिल्यानंतर भविष्यात कधीही उमेदवरांच्या चारित्र्य पडताळणी अहवालासंदर्भात प्रतिकूल फेर अहवाल प्राप्त झाल्यास अथवा त्याबाबत काही आक्षेपार्ह बाबी आढळून आल्यास तसेच उमेदवाराने स्वहस्ताक्षरात भरुन दिलेल्या साक्षांकन नमुना फॉर्ममध्ये भरुन दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची दिल्याचे निर्दशनास आल्यास त्यांना कोणतीही पुर्व सुचना न देता सेवा संपुष्टात आणली जाईल त्याबाबत आपणांस कोणतीही तक्रार अथवा दावा करण्याचा हक्क राहणार नाही.

२०) चालक पोलीस शिपाई  पदावर आपणांस नेमणूक दिल्यानंतर आपण पोलीस भरती होणेस आपण गैरमार्गाचा, अवैध बाबींचा अवलंब केल्याचे निदर्शनास आल्यास आपली सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल व त्याबाबत आपणांस कोणताही दावा करण्याचा हक्क राहणार नाही.

२१) पोलीस दलातील नोकरीबाबतची पात्रता व योग्यता आजमावण्यासाठी पोलीस प्रशिक्षण विद्यालयात आपली मानसिक चाचणी घेण्यात येईल, या मानसिक चाचणीत आपण **अपात्र** ठरल्यास आपणांस सेवामुक्त करण्यात येईल.

२२) महाराष्ट्र सहायक पोलीस उप निरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम, 2019 मधील नियम 16 (1) पोलीस शिपाई चालक या पदाकरिता निवड

करण्यात आलेले उमेदवार हे कार्यकारी पोलीस दलात बदलीसाठी पात्र असणार नाहीत, मात्र हे उमेदवार विनंतीनुसार जिल्ह्याच्या बाहेर फक्त इतर पोलीस घटकात त्याच पदावर बदलीस पात्र असतील. तसेच शासन निर्णय 26/10/2017 मधील अटी व शर्तींनुसार बदलीस पात्र असतील.

२३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील परिपत्रक क्रमांक पोमसं/ 6/10 /पोशि/ भरती/ सेवाज्येष्ठता/ 251/2012, दिनांक 17/08/2013, स्थायी आदेश क्रमांक 2213 मधील तरतुदींनुसार सेवाज्येष्ठता निश्चित करण्यात येईल.

२४) नियुक्ती आदेशामधील जे उमेदवार सध्या शासकीय /निमशासकीय सेवेत इतर ठिकाणी कार्यरत असतील अशा उमेदवारांनी चालक पोलीस शिपाई भरतीसाठी भरलेल्या आवेदन अर्जानुसार संबंधित कार्यालयाची परवानगी घेतलेली असावी. तसेच पूर्वीच्या सेवेचा राजीनामा मंजूरीबाबतचे आदेश किंवा कार्यमुक्तीचे आदेश कर्तव्यावर हजर होणेपूर्वी या कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.

२५) महाराष्ट्र शासन वित्त विभाग राजपत्र भाग-4 अ, दिनांक 30/12/2021 मधील महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) (सुधारणा) नियम 2021 मधील तरतुदींनुसार जन्म तारीख अचूक असलेबाबत हमीपत्र सादर करणे बंधनकारक आहे. त्यानुसार एकदा नोंदविलेल्या जन्म तारखेच्या नोंदीत मध्ये बदल करण्याची विनंती स्विकारली जाणार नाही.

२६) महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचेकडील परिपत्रक क्र.संकिर्ण-20212/प्र.क्र.52/सेवा-3, दिनांक 22/12/2021 अन्वये शासकीय सेवेत नव्याने नियुक्ती झाल्यानंतर किंवा अन्य प्रकारे वेतन निश्चीती/वेतनवाढी/ अथवा इतर कोणत्याही आर्थिक लाभाच्या /प्रदानाच्या अनुषंगाने संपुर्ण सेवा कालावधीत नियमानुसार अथवा कायद्यानुसार देय व अनुज्ञेय ठरत नसतांना अतिरिक्त रक्कम प्रदान झाल्याची बाबत सद्य:स्थितीत /भविष्यात शासनाच्या निदर्शनास आल्यास अशी अतिप्रदानाची रक्कम शासनास परत करण्याचे लेखी वचनपत्र देणे बंधनकारक राहील.

२७) चालक पोलीस शिपाई पदावर नियुक्ती दिल्यानंतर उमेदवारास उच्च शिक्षण अथवा इतर विभागाच्या नियुक्तीसाठी परिक्षा द्यावयाची असल्यास त्या परिक्षेस बसण्यासाठी या कार्यालयाची परवानगी बंधनकारक राहील.

२८) अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती प्रवर्गातील महिला उमेदवार वगळून इतर प्रवर्गातून निवड झालेल्या महिला उमेदवारांसाठी उन्नत व प्रगत व्यक्ती गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र तपासणीच्या अधिन राहून महिला उमेदवार यांना तात्पुरती नियुक्ती देण्यात येत आहे. तसेच प्रमाणपत्र अवैध ठरल्यास नियुक्ती तात्काळ प्रभावाने रद्द करण्यात येईल.

२९) नियुक्ती दिलेल्या चालक पोलीस शिपाई यांना महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951, महाराष्ट्र पोलीस नियमावली 1999, महाराष्ट्र पोलीस (शिक्षा आणि अपिले) 1956, महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 व रजा सेवानिवृत्ती इत्यादी प्रयोजनार्थ महाराष्ट्र सहायक पोलीस उप निरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम, 2019 व त्यानंतर शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारणा, तसेच महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले अन्य नियम व तरतुदी तसेच पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी वेळोवेळी निर्गमित केलेले नियम, आदेश, परिपत्रके लागू राहतील.

३०) महिला उमेदवारांबाबत प्रसुती रजेसंदर्भात महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक प्ररजा 2015/प्र.क्र.25/ सेवा-6, दिनांक 15/01/2016 मधील तरतुदी व शासनाने वेळोवेळी दिलेले आदेश व रजा नियम लागू राहतील.

३१) चालक पोलीस शिपाई पदावर नेमणूक दिल्यानंतर पोलीस भरती होण्यासाठी गैरमार्गाचा, अवैध बाबींचा अवलंब (चारित्र्य पडताळणी / शैक्षणिक प्रमाणपत्रे / जातीचा दाखला / जात पडताळणी (वैधता) / डोमिसाईल / नॉन क्रिमीलेअर / पोलीस पाल्य/ खेळाडू/ प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त / माजी सैनिक / गृहरक्षक दल / अनाथ / महिला आरक्षण इ. प्रमाणपत्रे व पोलीस भरतीसाठी सादर केलेली इतर कागदपत्रे / प्रमाणपत्रे ही खोटी / बनावट आढळून आल्यास तसेच कोणतीही वस्तुस्थिती निदर्शक माहिती दडवून ठेवणे अथवा खोटी माहिती दिली असल्याचे आढळून आल्यास) केल्याचे निदर्शनास आल्यास आपली सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल व त्याबाबत आपणांस कोणताही दावा करण्याचा हक्क राहणार नाही.

**रितु खोखर (भा.पो.से.)**
पोलीस अधीक्षक, धाराशिव

**प्रति :- वरील संबंधितांना**

**<u>प्रत आवश्यक त्या पुढील कार्यवाहीकरिता</u>**:- <u>राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, धाराशिव.</u>

2/- संबंधीत उमेदवारास आदेशाची एक प्रत अदा करुन प्रत मिळालेबाबत त्यांची दुय्यम प्रतीवर दिनांकित स्वाक्षरी घेवून या कार्यालयास परत करावी.

3/ सदर आदेशामधील नमूद नवप्रविष्ठ चालक पोलीस शिपाई यांना पोलीस मूख्यालय, धाराशिव येथे हजर करुन घेऊन त्याची नोंद आपले हजेरीपटावर घेण्यात यावी. नवप्रविष्ठ चालक पोलीस शिपाई यांना सर्व किट सरंजाम किट पेटीसह अदा करण्यात यावा. तसेच त्यांचेकडून राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडून खाते क्रमांक वेतन आकारणीसाठी लेखा शाखेस देण्यात यावा तसेच हजर झालेबाबतची दिनांकासह माहिती आस्थापना शाखा व लेखा शाखेस तात्काळ कळविण्यात यावी.

**<u>प्रत</u>** :- प्रमुख लिपीक, लेखाशाखा पोलीस लेखापाल/वेतन लिपिक-2/गटविमा लिपीक/इमारत लिपीक/प्रमुख भांडारपाल /जिल्हा पोलीस पत्रिका लिपीक, धाराशिव.

2/- प्रमुख लिपीक लेखा शाखा यांनी उक्त प्रमाणे नियूक्ती दिलेले चालक पोलीस शिपाई अंमलदार यांना शासकीय सेवेत नियूक्ती झालेने नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत नव्याने विहीत करण्यात आलेली राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (एनपीएस) मधील विहीत नमुन्यातील फॉर्म त्वरीत भरुन घ्यावेत. तसेच त्यांचेकडून बँक खाते क्रमांक प्राप्त करुन घेऊन प्रचलित नियमानुसार नियमित वेतन व भत्त्यांची आकारणी करण्यात यावी.

**प्रभारी अधिकारी, आयटी सेल, धाराशिव** .

2/- वरील प्रमाणे नियुक्ती आदेशाची समज सर्व उमेदवारांना फोनद्वारे तसेच एसएमएस व व्हॉटस्ॲपद्वारे द्यावी.

**<u>प्रत माहितीस्तव सविनय सादर</u>** :-

1. मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र, छत्रपती संभाजीनगर.
2. मा. अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
3. मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.